**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad, Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट** **दिनांक - १९/०७/२०२३**

## दिशा उपक्रम अंतर्गत विशेष जनजागृती मोहीम कार्यक्रमाचे आयोजन

मा. पोलीस आयुक्त, विनय कुमार चौबे सो. पिंपरी चिंचवड यांचे संकल्पनेतुन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय अंतर्गत विशेष बाल पोलीस पथकामार्फत बालकांच्या उज्वल भविष्यासाठी **"दिशा"** हा उपक्रम पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात दिड वर्षापासुन सुरु करण्यात आलेला आहे. पोलीस ठाणेस्तरावर दाखल होणा-या विविध गुन्ह्यांमध्ये अल्पवयीन बालकांचा सहभाग दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येत आहे. यामध्ये प्रामुख्याने बालकांचे गुन्ह्याकडे वळण्यांचे प्रमाण अधिक असून अशा बालके कळत न-कळत गुन्हेगारी मार्गावर गेल्याचे दिसुन येत आहे. या अनुषंगाने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयामध्ये **विशेष बाल पथकाव्दारे** सर्व पोलीस स्टेशन स्तरावर राबविण्यात येणा-या **"दिशा"** या उपक्रमांतर्गत **बालकांना** त्यांचे भविष्याच्या दृष्टीकोनातुन मार्गदर्शन व समुपदेशन करून योग्य प्रवाहात आणण्यासाठी सहयोगी अशासकीय संस्थां व त्यांचे प्रतिनिधी तसेच **एकुण २७३ महिला/गृहीणी समिती सदस्य, क्रिडा समन्वयक, शिक्षण समन्वयक** आणि **व्यसनमुक्ती समन्वयक** असे **एकुण १८५** समन्वयकांची पोलीस ठाणे स्तरावर नेमणुक करण्यात आली असुन प्रभागानुसार एक **पोलीस अधिकारी समन्वयक** म्हणुन नेमणुक करण्यात आलेली आहे. यांचे मार्फतीने अशा विधीसंघर्षित बालकांचे पुर्नवसन करणे असे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील **विशेष बाल पथकाचे** मार्फतीने सर्व पोलीस स्टेशन स्तरावरील सर्व भागात **१. तेरे देस होमस जर्मनी २. होपस फॉर द चिल्ड्रन फाउंडेशन ३. मुस्कान फाउंडेशन ४.संदेश बोर्डे स्पोर्टस फाउंडेशन ५. आरोग्य मित्र फाउंडेशन ६.विमल व्यसनमुक्ति फाउंडेशन ७. स्माईल फाउंडेशन ८. न्यु व्हिजन फाउंडेशन** अशा एकुण **०८ सहयोगी अशासकीय संस्थांचे** मदतीने **"दिशा"** हा उपक्रम संपुर्ण शहरात राबविण्यात येत आहे.

### दिशा उपक्रम अंतर्गत केलेली कामगिरी

- पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दिमध्ये आतापर्यत **एकुण ४१०** विधीसंघर्षित बालकांना **समुपदेशन** करुन **मुख्य प्रवाहात** आणण्याचे काम केले आहे.
- **एकुण ०७** बालकांना **व्यावसायिक प्रशिक्षण** देवुन स्वतःचा व्यवसाय सुरु करण्याची संधी उपलब्ध करुन दिली.
- **एकुण २४** बालकांना **शाळेत प्रवेश** मिळवुन दिला सदयस्थितीत ते शिक्षण घेत आहे.
- **एकुण १२** विधीसंघर्षग्रस्त बालकांनी **कोहिनुर इन्स्टीटयुट** चिंचवड येथे **इलेक्ट्रीकल वायरमन कोर्स** पुर्ण केले.
- **एकुण ०७** बालकांसाठी **मोबाईल दुरूस्ती कोर्स/प्रशिक्षण** देण्यात आले आहे.
- निगडी, दिघी व हिंजवडी पोलीस स्टेशन येथे **बालस्नेही कक्षाची** स्थापना करण्यात आली असुन तेथे विधीसंघर्षग्रस्त बालके व पोक्सो गुन्हयातील १८ वर्षाखालील पिडित बालकांचे समुपदेशन करण्यात येत आहे.
- बालकांसाठी पोक्सो या **कायदयाची माहिती, बालकांचे शिक्षण, व्यसनाचे दुष्परिणाम** या विषयावर **एकुण १४ पथनाटय, ६ रॅली** असे **जनजागृती कार्यक्रम,** दैनंदिन जीवन कौशल्य विकास कार्यक्रम, व्यसनमुक्ति जनजागृती कार्यक्रम, शिक्षण जनजागृती रॅलीचे आयोजन असे **एकुण १०४ जनजागृतीचे** कार्यक्रम घेण्यात आलेले आहे. तसेच **एकुण ३३ व्यसनमुक्ती शिबीरे घेण्यात आलेली आहेत.**
- **मनोधैर्य** योजनेसाठी पाठपुरावा करण्यात येत असुन पोक्सो गुन्हयामधील **एकुण २** गुन्हयामंध्ये **सपोर्ट पर्सन** म्हणुन कामकाज करुन घेण्यात येत आहे.
- **एकुण १२०** विधीसंघर्षग्रस्त बालकांसाठी **निगडी ओटा स्किम** येथे **क्रिडा प्रशिक्षण** देण्यात येत आहे.
- व्यसनाच्या आहारी गेलेल्या बालकांकरिता **पिंपरी व निगडी** येथे **व्यसनमुक्ति केंद्र** स्थापण करण्यात आले असुन व्यसनाच्या आहारी गेलेल्या **एकुण ३५** बालकांना **मोफत उपचार व समुपदेशन** करण्यात आले आहे.

- पिंपरी चिंचवड शहरातील **एकुण ३५** फासे पारधी समाजाच्या मुलांचे **जातीचे दाखले** काढणेसाठी पाठपुरावा करण्यात आलेला आहे.

तसेच यापुढेही संपुर्ण पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दित **दिशा उपक्रम** अंतर्गत **बालकांचे उज्जल भविष्यासाठी** शहरातील सहयोगी अशासकीय संस्थांचे मदतीने जास्तीत जास्त जनजागृती शिबीरांचे/ कार्यक्रमांचे आयोजन करुन अशा बालकांना योग्य दिशा दाखविण्याकरीता पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय नेहमीच कटिबद्ध असणार आहे.

दिनांक १८.०७.२०२३ रोजी विधीसंघर्षित बालकांसाठी स्माईल फाउंडेशन, संदेश बोर्डे फाउंडेशन, तेरे देस होम (संवाद समुपदेशन केंद्र) या सहयोगी अशासकीय संस्थाचे मदतीने विशेष जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला सदर कार्यक्रमास **पिंपरी, चिंचवड, निगडी या** भागातील **विधीसंघर्षित बालके** व त्यांचे **पालक**(आई-वडील-नातेवाईक) असे एकुण १४० उपस्थित होते. उपस्थितांना **स्माईल फाउंडेशनचे** श्री.अमोल कुलकर्णी व श्री. हर्षल जोशी**, तेरे देस होमस** (संवाद समुपदेशन केंद्र)चे श्री. गजानन कोरडे, **संदेश बोर्डे फाउंडेशन**चे श्री. संदेश बोर्डे तसेच मा. सहायक पोलीस आयुक्त **श्री. सतीश कसबे** सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक **श्री. जितेंद्र कदम** गुन्हे शाखा युनिट २ यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

सदरचा दिशा उपक्रमांर्तगत जनजागृती कार्यक्रम मा. पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे सो, मा.पोलीस सहआयुक्त डॉ. संजय शिंदे सो, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी सो, मा. पोलीस उपआयुक्त स्वप्ना गोरे मॅडम (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली मा. सहा.पोलीस आयुक्त, श्री. सतीश कसबे सो (पिंपरी विभाग) व वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र कदम गुन्हे शाखा युनिट २ पोउपनि श्री. माने, सपोफौ चौधरी, पोहवा तांबोळी, मपोहवा/दळे, पोलीस अंमलदार सानप व विशेष बाल पोलीस पथकाचे पोलीस उपनिरीक्षक श्री. संपत निकम, मपोना/शिर्के, पोलीस अंमलदार मुठे, पोलीस अंमलदार लोहरे यांनी यशस्वीरित्या पार पाडला.

**(स्वप्ना गोरे)**
**पोलीस उप आयुक्त गुन्हे**
**पिंपरी चिंचवड.**